# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**महत्त्वाचे/कालमर्यादित**

क्र.संगाबाअवि/१/१०२/इ-१९(के)/१-१०८/२०२०
दिनांक : २०/०१/२०२०

प्रति,

प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२०**
संदर्भ : विनियम क्र.३/२०१८ (विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक/शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबतचे विनियम, २०१८)

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात विद्यापीठाद्वारे तयार करण्यात आलेले संदर्भांकित विनियम क्र. ३/२०१८ कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सदरील विनियम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) उपलब्ध असून त्यानुसार संबंधीत गटातून पात्र ठरणाऱ्या महाविद्यालयीन प्राचार्य/संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा, त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल तथा योगदानाबद्दल विद्यापीठाच्या वर्धापन दिनी (१ मे, २०२०) गौरव करावयाचा आहे. याकरिता खालीलप्रमाणे गटांची वर्गवारी करण्यात आली आहे.

**महाविद्यालय स्तर :** अ) संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक
ब) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक
क) संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेतर कर्मचारी

महाविद्यालयाच्या आस्थापनेत सलग ५ वर्षे सेवा झालेल्या प्राचार्य/संचालक/शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधून उपरोक्त ३ गटांत प्रत्येकी १ याप्रमाणे खालील स्वरूपाचे पुरस्कार देण्याबाबत विचार करण्यात येईल.

**१) प्रमाणपत्र** **२) शाल व श्रीफळ** **३) १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक**

उपरोक्त प्रयोजनार्थ सदर उपक्रमात सहभागी होण्यास इच्छुक असणाऱ्या संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून (www.sgbau.ac.in) विहीत प्रपत्रातील अर्जाचा नमुना प्राप्त करून आवश्यक माहिती तथा सहपत्रांसह ६ **संचामध्ये** महाविद्यालयांच्या प्राचार्य/संचालक/संस्थाप्रमुखांकडे सादर करावा.

संबंधितांनी विनियमामध्ये नमुद निकषांची पुर्तता करणाऱ्या तथा गौरवाकरीता पात्र वाटणाऱ्या गटनिहाय फक्त एका प्राचार्य/संचालक/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे (गट क मधील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यासंदर्भात एक अथवा महत्तम दोन) अर्ज आवश्यक सहपत्र तथा अभिप्रायासह ६ **संचामध्ये** गोपनियरित्या, मोहोरबंद लिफाफ्यात **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे दि. ५ मार्च २०२० ते ३१ मार्च २०२० पर्यंत** पाठवावयाचे आहेत. विनियमाप्रमाणे प्रस्ताव स्वीकारण्याची अंतिम तिथी दि. ३१ मार्च २०२० असल्यामुळे डाकेने पाठविण्यात येणारे प्रस्ताव दि. ३१ मार्च २०२० किंवा तत्पुर्वी विद्यापिठाकडे पोहोचतील या बेताने पाठविण्यात यावेत. महाविद्यालयीन प्राचार्य/संचालक यांचे संदर्भात संबंधित संस्थाचालकांनी तसेच शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे संदर्भात प्राचार्यांनी / संस्था प्रमुखांनी त्यांचे अभिप्राय तथा शिफारस नोंदवून संबंधित शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अर्ज त्यांच्या मागील सलग ५ वर्षाच्या विहीत नमुन्यातील गोपनीय अहवालाच्या प्रमाणित प्रतींसह ६ **संचामध्ये** विद्यापीठास पाठवावयाचे आहेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज कुठल्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

..२

याशिवाय सदर प्रयोजनार्थ तयार करण्यात आलेल्या विनियमातील मुद्दा क्र. ७ नुसार नाविन्यपूर्ण उपक्रमाचे संदर्भात महाविद्यालयाचे / संस्थेचे प्रस्ताव असल्यास ते सुद्धा उपरोक्त विहीत मुदतीत विद्यापीठास सादर करण्यात यावेत.

**संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) उपलब्ध असलेला विहीत नमुन्यातील अर्ज प्राप्त करून महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक/संस्था चालकांकडे आवश्यक माहिती तथा सहपत्रांसह सादर करावा व संबंधितांनी सादर केलेले अर्ज, नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांचे अभिप्राय तथा शिफारशीसह विद्यापीठ कार्यालयास दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. त्याचप्रमाणे, नाविन्यपूर्ण उपक्रमासंदर्भात प्रस्ताव असल्यास तेही विहित मुदतीत सादर करावेत.**

**महत्वाचे**

**प्रस्तुत अर्जासह विनियमातील परिच्छेद १० मध्ये दिलेल्या निकषाच्या पुष्ठ्यर्थ व इतर जी सहपत्रे जोडण्यात येतील त्या सर्वांना न चुकता अनुक्रमांक देऊन त्याची अनुक्रमणिका सहपत्रांच्या सुरूवातीस जोडण्यात यावी. सहपत्रांची पुस्तिका हाताळणीस सहज सुलभ असावी व जोडलेल्या अनुक्रमणिकेनुसार सदर सहपत्रे पताकांकित करून क्रमवार लावावी. यानुसार सदर प्रस्ताव नसल्यास ते स्वीकृत होणार नाहीत व अशा आणि अपुर्ण प्रस्तावासंबंधी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी. दि. ३१ मार्च, २०२० नंतर विद्यापीठास प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतल्या जाणार नाहीत.**

प्रस्तुत बाबीचे प्रयोजन हे विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यक्षम सहयोगातून विद्यापाठ व महाविद्यालंयास मिळणाऱ्या सेवेचा यथोचित गौरव व्हावा व या प्रेरणेतून आपल्या कामाच्या उत्तरदायित्वाची भावना वाढीस लागून कामकाजासंबधी अधिक सकस, गुणवत्तापुर्ण व कार्यक्षम वातावरण व्हावे या हेतूने, वरील सूचना आपल्या नियंत्रणाअंतर्गत शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देऊन या गौरवपुर्ण उपक्रमात त्यांना सहभागी होण्यासाठी प्रेरीत करावे ही विनंती.

आपला,

(डॉ.तुषार आर.देशमुख)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**कार्यालयीन सूचना क्र. ०५ /२०२०**

क्र.संगाबाअवि/१/१०२/ई-१९(के)/१/१०६/२०२० दिनांक :२०/०१/२०२०

**विषय : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, उत्कृष्ठ सेवा गौरव पुरस्कार २०२०**

संदर्भ : विनियम क्र. ३/२०१८ ( विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक/शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबतचे विनियम, २०१८)

उपरोक्त विषयाच्या संदर्भात विद्यापीठाद्वारे तयार करण्यात आलेल्या संदर्भांकित विनियमाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सदरील विनियम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) उपलब्ध असून विद्यापीठातील शिक्षक /प्रथम श्रेणी अधिकारी/द्वितीय श्रेणी अधिकारी/तृतीय श्रेणी कर्मचारी/चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल तथा योगदानाबद्दल विद्यापीठाच्या वर्धापन दिनी (१ मे, २०२०) संबंधितांचा गौरव करावयाचा आहे. याकरिता खालीलप्रमाणे गटाची वर्गवारी करण्यात आली आहे.

अ) शिक्षक
ब) प्रथम श्रेणी अधिकारी
क) द्वितीय श्रेणी अधिकारी
ड) तृतीय श्रेणी कर्मचारी
इ) चतुर्थ श्रेणी कर्मचारी

विद्यापीठ आस्थापनेत सलग ५ वर्षे सेवा झालेल्या शिक्षक /अधिकारी/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उपरोक्त ५ गटांमधुन प्रत्येकी १ याप्रमाणे खालील स्वरूपाचा पुरस्कार देण्याबाबत विचार करण्यात येईल.

**१) प्रमाणपत्र २) शाल व श्रीफळ ३) १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक**

उपरोक्त प्रयोजनार्थ सदर उपक्रमात सहभागी होण्यास इच्छुक असणाऱ्या शिक्षक /अधिकारी/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून (www.sgbau.ac.in) विहीत प्रपत्रातील अर्जाचा नमुना प्राप्त करून आवश्यक माहिती तथा सहपत्रांसह **६ संचामध्ये** आपले विभाग प्रमुख/नियंत्रण अधिकारी यांना सादर करावा.

विभाग प्रमुखांनी/नियंत्रण अधिकाऱ्यांनी विनियमामध्ये नमुद निकषांची पुर्तता करणाऱ्या तथा गौरवाकरीता पात्र वाटणाऱ्या उक्त नमुद गट अ, ब आणि क मधून फक्त एका शिक्षक / अधिकारी आणि गट ड व इ मधून प्रत्येकी एक अथवा महत्तम दोन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अर्ज आवश्यक सहपत्र तथा अभिप्रायासह **६ संचामध्ये** गोपनियरित्या मोहोरबंद लिफाफ्यात **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ** यांचेकडे **दि. ५ मार्च २०२० ते ३१ मार्च २०२०** पर्यंत पाठवावयाचे आहेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे व अपूर्ण अर्ज कुठल्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**महत्वाचे**

**प्रस्तुत अर्जासह विनियमातील परिच्छेद १० मध्ये दिलेल्या निकषाच्या पुष्ठ्यर्थ व इतर जी सहपत्रे जोडण्यात येतील त्या सर्वांना न चुकता अनुक्रमांक देऊन त्याची अनुक्रमणिका सहपत्रांच्या सुरूवातीस जोडण्यात यावी. सहपत्रांची पुस्तिका हाताळणीस सहज सुलभ असावी व जोडलेल्या अनुक्रमणिकेनुसार सदर सहपत्रे पताकांकित करून क्रमवार लावावी. यानुसार सदर प्रस्ताव नसल्यास ते स्वीकृत होणार नाहीत व अशा आणि अपुर्ण प्रस्तावासंबंधी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.**

प्रस्तुत बाबीचे प्रयोजन हे विद्यापीठ शिक्षक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यक्षम सहयोगातून मिळणाऱ्या सेवेचा यथोचित गौरव व्हावा व या प्रेरणेतून आपल्या कामाच्या उत्तरदायित्वाची भावना वाढीस लागून कामकाजासंबंधी अधिक सकस, गुणवत्तापुर्ण व कार्यक्षम वातावरण व्हावे या हेतूने, वरील सूचना आपल्या नियंत्रणाअंतर्गत शिक्षक/अधिकारी/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देऊन या गौरवपुर्ण उपक्रमात त्यांना सहभागी होण्यासाठी प्रेरीत करावे ही विनंती.

(डॉ.तुषार आर.देशमुख)
कुलसचिव

प्रति,
सर्व शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/प्रशासकीय विभागांचे नियंत्रण अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

## विनियम क्र. ३/२०१८

## विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संचालक / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार आणि संलग्नित महाविद्यालय/स्वायत्त संस्था यांना नाविन्यपुर्ण उपक्रमाबद्दल गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबतचे विनियम, २०१८

ज्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यापीठाला दिलेल्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल तसेच संलग्नित महाविद्यालय/स्वायत्त संस्था यांना नाविन्यपुर्ण उपक्रमाबद्दल गौरव करावयाचा निर्णय घेतलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रयोजनार्थ विनियम तयार करण्यात येत आहे.

१) हे विनियम "विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार आणि संलग्नित महाविद्यालय/स्वायत्त संस्था यांना नाविन्यपुर्ण उपक्रमाबद्दल गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबतचे विनियम क्र. ३/२०१८" असे संबोधण्यात येईल.

२) हे विनियम सन २०१९ पासून अस्तित्वात येतील.

३) **व्याख्या** -

**अ)** या विनियमातील " विद्यापीठ, महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक, विभाग प्रमुख, शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी, संलग्न महाविद्यालय, स्वायत्त महाविद्यालय, मान्यता प्राप्त संस्था " म्हणजे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, परिनियम, अध्यादेश व शासनाद्वारे अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांकरीता निर्गमित केलेले आदेश, यामध्ये नमुद केलेल्या परिभाषा.

**ब)** "समिती"म्हणजे सदर नियमांतर्गत द्यावयाच्या पुरस्कारासाठी पात्र असलेल्यांची निवड करण्याकरीता व्यवस्थापन परिषदेद्वारा मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती.

**क)** "गौरव" म्हणजे विद्यापीठ / संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य /संचालक/ शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सदर नियमांतर्गत द्यावयाचा पुरस्कार

४) **सदर प्रयोजनार्थ मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती खालीलप्रमाणे असेल.**

| | | |
|---|---|---|
| १) मा. कुलगुरू | .... | अध्यक्ष |
| २) व्यवस्थापन परिषदेने नामित केलेले व्य. प. चे दोन सदस्य | .... | सदस्य |
| ३) मा.कुलगुरु नामित शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय योगदान असलेली व्यक्ती | .... | सदस्य |
| ४) कुलसचिव | .... | सचिव |

५) **पुरस्काराची वर्गवारी खालीलप्रमाणे राहील.**

**अ) विद्यापीठ स्तर –**

| | | |
|---|---|---|
| (अ) शिक्षक | - | एक |
| (ब) प्रथम श्रेणी अधिकारी | - | एक |
| (क) द्वितीय श्रेणी अधिकारी | - | एक |
| (ड) तृतीय श्रेणी कर्मचारी | - | एक |
| (इ) चतुर्थ श्रेणी कर्मचारी | - | एक |

**ब) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था स्तर**

| | | |
|---|---|---|
| (अ) संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक | - | एक |
| (ब) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक | - | एक |
| (क) संलग्न महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी | - | एक |

६) **गौरव पुरस्काराचे स्वरूप पुढीलप्रमाणे राहील.**

(अ) प्रमाणपत्र ( परिशिष्ट - ड )
(ब) शाल व श्रीफळ
(क) १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक, ज्यावर एका बाजूने विद्यापीठाचे मोनोग्राम व दुसऱ्या बाजूने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ वर्धापन दिन - गौरवप्राप्त प्राचार्य /संचालक/ शिक्षक / अधिकारी / कर्मचारी यांचे नाव, १ मे —— असे नमूद केलेले असेल. (परिशिष्ट - इ )

७) **समितीला योग्य वाटल्यास संलग्नित महाविद्यालय, स्वायत्त संस्था यामध्ये राबविण्यात येणाऱ्या नाविण्यपुर्ण उपक्रमाबद्दल (Innovative Practices) एका महाविद्यालयाला प्रोत्साहनपर रू. ५००१/- (अक्षरी रू. पाच हजार एक फक्त) रोख पुरस्कार व प्रशस्ती पत्र देऊन गौरवान्वित करण्यात येईल.**

८) **मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली दरवर्षी १ मे रोजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनी ध्वजारोहणानंतर विशेष कार्यक्रमात गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतील.**

९) **गौरवानिमित्त पारितोषिक / प्रशस्तीपत्र प्राप्त करणाऱ्या व्यक्ती/ महाविद्यालयास खालील अधिकारी पुरस्कारक राहतील.**

| | | |
|---|---|---|
| अ) प्राचार्य / संचालक | - | मा.कुलगुरु नामित अधिष्ठाता * |
| ब) शिक्षक | - | संबंधित विद्याशाखेचे अधिष्ठाता * |
| क) प्रथम व द्वितीय श्रेणी अधिकारी | - | कुलसचिव |
| ड) तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी | - | कुलसचिव |
| इ) महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था | - | कुलसचिव |

**(* अधिष्ठाता नसल्यास मा.कुलगुरुंनी नामित व्यक्ती)**

१०) **गौरवासाठी निवड करतांना खालील निकष विचारात घेण्यात येतील.**

**अ) प्राचार्य /संचालक/ शिक्षकांकरीता -**

i) विद्यापीठात/ महाविद्यालयात सलग किमान ५ वर्षे सेवा
ii) महाविद्यालयातील / वर्गातील उपस्थितीचे प्रमाण
iii) वर्गात विद्यार्थ्यांना शिकविण्याची शैली
iv) विषयासंबंधीच्या परिषदामधील सहभाग
v) शोधपत्रिका प्रकाशनात असलेला सहभाग (संपादक, प्रकाशक, सल्लागार, परीक्षक म्हणून सहभाग)
vi) प्रकाशित झालेले शोधनिबंध ( ISSN, MPSIR, ICCSR, दर्जा प्राप्त शोधपत्रिका )
vii) प्रकाशित झालेले पुस्तके ( ISBN No. प्राप्त )
viii) आंतरराष्ट्रीय स्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध
ix) राष्ट्रीय स्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध
x) राज्यस्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध
xi) विद्यापीठाच्या कार्यक्रमात, उपक्रमात, प्रकल्पात प्रत्यक्ष घेतलेला सहभाग.
xii) विद्यापीठ स्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध
xiii) विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणीवरील निवड / नियुक्ती.
xiv) विभागाच्या विकासात्मक कामातील रूची
xv) महाविद्यालयात संचालित होणाऱ्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमातील सहभाग
xvi) महाविद्यालयात नॅकचे मानांकन मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न
xvii) मागील सलग पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाचा दर्जा.
xviii) इतर

**ब) अधिकारी / कर्मचाऱ्यांकरीता -**

i) विद्यापीठात सलग किमान ५ वर्षे सेवा
ii) कार्यालयातील उपस्थितीची नियमितता
iii) शैक्षणिक पात्रता
iv) कार्यालयीन कामकाजातील वक्तशिरपणा
v) वर्षभरातील घेतलेल्या सुटीचे प्रमाण
vi) कार्यालयीन कामकाजात उत्स्फूर्त पुढाकार
vii) गोपनीय दर्जाचे काम / महत्वाचे दस्तऐवज सांभाळण्याची क्षमता
viii) वरिष्ठांशी, सहकाऱ्यांशी व जनतेशी संबंध
ix) विश्वसनियता
x) ज्ञानस्तर
xi) कार्यालयीन काम पूर्ण करण्याची रूची
xii) अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून काम करवून घेण्याचे कौशल्य
xiii) मागील सलग पाच वर्षांच्या गोपनीय अहवालाचा दर्जा.
xiv) इतर

**११) पुरस्कारासाठी अर्ज करण्याची पद्धती.**

अ) संलग्नित महाविद्यालये / प्राचार्य /संचालक/ शिक्षक / अधिकारी / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विद्यापीठाने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये दरवर्षी दिनांक ५ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत विद्यापीठाकडे अर्ज सादर करावा लागेल. उपरोक्त अर्जाचा नमुना विनियम क्र. ३/२०१८ सह विद्यापीठाच्या संकेत स्थळावर व कार्यालयात उपलब्ध राहील. विद्यापीठाच्या संकेत स्थळावरून विहीत नमुना उपलब्ध करून घेऊन (Download) अर्ज सादर करावयाचा आहे. विद्यापीठाच्या स्तरावर कार्यालयीन सूचना निर्गमित करण्यात यावी व महाविद्यालयांकरीता वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध करावी.

**ब) विविध वर्गवारीसाठी वापरावयाचा नमुना**

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य/संचालक | - परिशिष्ट - अ (प्रपत्रासह) |
| २) | विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षक | - परिशिष्ट - ब (प्रपत्रासह) |
| ३) | अधिकारी / कर्मचारी | - परिशिष्ट - क |

**क) विभागप्रमुख / नियंत्रण अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही.**

संस्थेचे अध्यक्ष/ सचिव, विभाग प्रमुख / नियंत्रण अधिकारी यांनी गौरवाकरिता निवड करण्यासाठी आपल्या नियंत्रणाअंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून प्राप्त प्रपत्रांची छाननी करून प्रस्तुत गौरवाकरिता पात्र ठरू शकणाऱ्या गटनिहाय एक प्राचार्य /संचालक/ शिक्षक / अधिकारी (प्रथम व द्वितीय श्रेणी) चे नाव अभिप्रायासह सुचवतील आणि तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांमधून प्रत्येकी एक अथवा महत्तम दोन कर्मचाऱ्यांची नावे अभिप्रायासह सुचवतील. सदर प्रपत्र अभिप्रायासह चार प्रतीत गोपनियरित्या मोहोरबंद लिफाफ्यात कुलसचिवांचे नावे सादर करतील. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे अभिप्राय विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१२) सदर विनियमांतर्गत गौरवासाठी निवड करण्याकरीता गठीत केलेल्या समितीच्या शिफारसी स्वीकृत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना राहतील. तथापि, मा. कुलगुरूंनी प्रदान केलेल्या पुरस्कारांची माहिती व्यवस्थापन परिषदेला माहितीकरीता तातडीने सादर करण्यात येईल. तसेच सदरील माहिती विद्यापीठाच्या राजपत्रात तसेच वार्षिक अहवालामध्ये प्रसिद्ध करण्यात येईल.

१३) सदर उपक्रमाकरीता पदके तयार करण्याची तसेच दरवर्षी अंदाजपत्रकात तरतूद करण्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत करण्यात येईल.

१४) गौरव पुरस्कार मिळण्यासाठी ज्या व्यक्तींनी विहीत पद्धतीनुसार अर्ज केलेला नसेल व अशा व्यक्ती पुरस्कारास पात्र ठरू शकतात, असे समितीच्या प्रथमदर्शनी लक्षात आल्यास अशा व्यक्तींचे अर्ज त्यांच्या नियंत्रण अधिकाऱ्याकडून मागविण्यात यावे व समितीच्या पुढील सभेसमोर विचारार्थ ठेवण्यात यावे.

*****

(परिशिष्ट - अ)

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## आवेदकाचे स्वयं मुल्यमापन

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयीन प्राचार्य/संचालक यांच्या गौरव पुरस्कारासाठी खालील माहिती आवेदकाने स्वतः भरुन संस्थेच्या सचिव /अध्यक्षांमार्फत सादर करावी.

प्राचार्य/संचालकाचे नांव ________________________________

महाविद्यालयाचे नाव : ____________________ प्रथम नियुक्ती दिनांक ________________

| | | |
|---|---|---|
| १ | प्राचार्य/संचालक म्हणून सलग ५ वर्ष सेवा झालेली आहे काय? | |
| २ | शोधपत्रिकेत (ISSN) प्रकाशित झालेल्या शोधनिबंधांची संख्या. (वैयक्तिक) | |
| ३ | प्रकाशित साहित्य / पुस्तके (ISBN) ची संख्या.(वैयत्तीक) | |
| ४ | राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या व उपस्थिती (वैयक्तिक) | |
| ५ | विद्यापीठाच्या उपक्रमात, कार्यक्रमात, प्रकरणात प्रत्यक्षात घेतलेला सहभाग. | |
| ६ | महाविद्यालयास प्राचार्यांच्या कालावधीत कायम संलग्निकरण प्राप्त झाले किंवा कसे.? नसल्यास, त्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले.? | |
| ७ | महाविद्यालयाचे नॅक/ एनबीए संस्थेकडून मूल्यांकन / पुनर्मुल्यांकन करण्यात आले आहे किंवा कसे.? सद्यस्थितीचा दर्जा/स्कोअर काय आहे? | |
| ८ | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परिक्षांचे निकाल/ गुणवत्तेबाबत मागील पाच वर्षाचा आलेख. | |
| ९ | महाविद्यालयामध्ये प्राचार्याच्या कालावधीत किती नवीन अभ्यासक्रम सुरू केले? | |
| १० | महाविद्यालयातील किती अध्यापकांना / विद्यार्थ्यांना पीएच.डी. साठी प्रोत्साहीत करण्यात आले? तद्वतच महाविद्यालयामार्फत संशोधनाचे मोठे (मेजर) व लघु (मायनर) स्वरूपाचे किती प्रकल्प सादर करण्यात आले आहेत ? तसेच मान्य झालेल्या प्रकल्पांची संख्या | |
| ११ | महाविद्यालयमध्ये कोणत्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत(भौतिक व शैक्षणिक)? तसेच महाविद्यालय परिसर, कार्यालय, वर्ग, ग्रंथालय, प्रयोगशाळा, प्रसाधनगृहे स्वच्छते संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येते? | |
| १२ | महाविद्यालयामार्फत राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणीक कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले? | |
| १३ | महाविद्यालयास विविध उपक्रमाबद्दल मिळालेली पारितोषिके | |
| १४ | महाविद्यालयासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी.), जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) व इतर संस्थाकडून (शासकीय व अशासकीय) विविध योजनांकरिता किती अनुदान प्राप्त केले याचा तपशील. | |
| १५ | महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी लेबॉरेटरिज, इंडस्ट्रीज, एन.जी.सी. व सामाजिक आणि शैक्षणिक संस्था व इतर यांच्यातील समन्वय (लिंकेजेस) साधण्यात आला आहे काय.? | |

| | | |
|---|---|---|
| १६ | महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यासाठी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त किती इतर उपक्रम राविण्यात आले? | |
| १७ | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध खेळातील जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्राविण्य मिळविण्याची किती टक्केवारी आहे. तसेच विद्यार्थ्यांचे एन.सी.सी. / एन.एस.एस. मधील योगदान कसे आहे, सांस्कृतिक कार्यक्रम कशाप्रकारे राबवितात.? | |
| १८ | आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातीच्या जर्नल (इंटरनॅशनल पीअर जर्नल) मधून महाविद्यालयातील संशोधकांनी किती शोधनिबंध प्रकाशित केले. | |
| १९ | महाविद्यालयामार्फत उच्च शिक्षण सुधारण्याबाबत कोणते नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जातात, अभ्यासक्रमात कमकुवत विद्यार्थ्यासाठी कोणती विशेष योजना / प्रयत्न केले जातात ? | |
| २० | महाविद्यालयामार्फत मागास, अल्पसंख्यांक व गरजू विद्यार्थ्यांसाठी कोणत्या विशेष योजना राबविण्यात येतात ? | |
| २१ | महाविद्यालयामार्फत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तक्रारी निवारण्याबाबत कशाप्रकारे कार्यवाही केली जाते ? महिला तक्रार निवारण कक्ष | |
| २२ | महाविद्यालयाचे स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण केले आहे किंवा कसे, सदर संकेतस्थळ अद्ययावत ठेवण्यात येते काय ? | |
| २३ | महाविद्यालयामध्ये संगणक प्रणालीचा पूर्णपणे वापर करण्यात येतो किंवा कसे ? | |
| २४ | महाविद्यालयाकडून चालविण्यात येणाऱ्या एकूण अभ्यासक्रमापैकी किती अभ्यासक्रम व्यवसायाभिमुख आहेत. | |
| २५ | इतर | |

------------------------------------------

स्थळ - स्वाक्षरी

दिनांक -

*टिप : आवश्यक तेथे पुरावे सादर करावे. आवश्यकता भासल्यास पुरवणी कागद वापरता येईल.*

**संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे अभिप्राय**

(टिप : प्राचार्य/ संचालकांचे सलग ५ वर्षे सेवेबाबतचा अभिप्राय )

स्थळ :
दिनांक :

अध्यक्ष / सचिवांची
स्वाक्षरी व शिक्का

संस्थेचे नाव :- ——————————————————

**कार्यालयीन उपयोगाकरिता**
**अहवालातील निरिक्षण**

कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

(परिशिष्ट - ब)

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## आवेदकाचे स्वयं मुल्यमापन

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयीन शिक्षकांच्या गौरव पुरस्कारासाठी खालील माहिती आवेदकाने स्वतः भरुन विभाग प्रमुख/प्राचार्य/संचालकांकडे सादर करावी.

शिक्षकाचे नांव : ______________________________

पदनाम : ____________ विभाग ____________ प्रथम नियुक्ती दिनांक ____________

| | | |
|---|---|---|
| १ | विद्यापीठात/महाविद्यालयात सलग ५ वर्ष सेवा झालेली आहे काय? | |
| २ | वर्गातील विद्यार्थ्यांचे उपस्थितीचे प्रमाण | |
| ३ | वर्गात विद्यार्थ्यांना शिकविण्यात तंत्रज्ञानाचा वापर होतो काय? | |
| ४ | विषयासंबंधीच्या परिषदांमधील सहभाग असल्यास किती? | |
| ५ | शोधपत्रिका प्रकाशनात असलेला सहभाग, असल्यास किती? (संपादक प्रकाशक, सल्लागार, परीक्षक म्हणून सहभाग) | |
| ६ | प्रकाशित झालेले शोधनिबंध (ISSN, MPSIR, ICCSR, दर्जा प्राप्त शोधपत्रिका) यांची संख्या | |
| ७ | प्रकाशित झालेले पुस्तके (ISBN) यांची संख्या | |
| ८ | आंतरराष्ट्रीयस्तरावर वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या | |
| ९ | राष्ट्रीयस्तरावर वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या | |
| १० | राज्यस्तरावर वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या | |
| ११ | विद्यापीठ स्तरावर वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या | |
| १२ | विद्यापीठाच्या उपक्रमात, कार्यक्रमात, प्रकरणात प्रत्यक्षात घेतलेला सहभाग. (सविस्तर माहिती सादर करावी) | |
| १३ | विद्यापीठाच्या प्राधिकारिणांवरील निवड/नियुक्ती (सविस्तर माहिती सादर करावी) | |
| १४ | विभागाच्या विकासात्मक कामातील सहभाग (सविस्तर माहिती सादर करावी) | |
| १५ | महाविद्यालयात संचालित होणाऱ्या अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमातील सहभाग (सविस्तर माहिती सादर करावी) | |
| १६ | महाविद्यालयात नॅकचे मानांकन प्रक्रियेत असलेला सहभाग | |
| १७ | राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभाग | |
| १८ | अभ्यासक्रम पुनर्रचनेमध्ये सहभाग | |
| १९ | विद्यापीठ/महाविद्यालय स्तरावरील परीक्षेमध्ये सहभाग | |
| २० | माजी विद्यार्थी मेळाव्यात सहभाग | |
| २१ | शिक्षक पालक सभेच्या आयोजनांमध्ये सहभाग | |
| २२ | राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील सेमिनार/कार्यशाळा/परिषदेच्या आयोजनामध्ये सहभाग | |
| २३ | इतर | |

---------------------------------------

स्थळ                                                            स्वाक्षरी

दिनांक

*टिप : आवश्यक तेथे पुरावे सादर करावे. आवश्यकता भासल्यास पुरवणी कागद वापरता येईल.*

## विभाग प्रमुख / प्राचार्य / संचालकांचे अभिप्राय

(टिप : विद्यापीठ / महाविद्यालयातील शिक्षकांचे संदर्भात संबंधित शिक्षकाचे सलग ५ वर्षे सेवेबाबतचा अभिप्राय देण्यात यावा तसेच महाविद्यालयातील शिक्षकांचे संदर्भात मागील सलग ५ वर्षे सेवेच्या गोपनिय अहवालाचे अंश नमूद करुन त्यासंबंधी अहवालाच्या प्रमाणित प्रती सोबत जोडण्यात याव्यात. )

स्थळ :
दिनांक :

प्राचार्य/ संचालक/ विभाग प्रमुखांची
स्वाक्षरी व शिक्का

## कार्यालयीन उपयोगाकरिता
### गोपनिय अहवालातील निरिक्षण

कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्राचार्य/संचालक/शिक्षकांनी या प्रपत्रात माहिती भरून हे प्रपत्र परिशिष्ट-अ/परिशिष्ट-ब सोबत जोडावयाचे आहे.

**Academic Performance Indicators (API)**

(Please furnish the requisite information in the tune with eligibility condition for the respective Gaurav Puraskar)

1. Name of the applicant as per official record : ……………………………………..
2. Address for correspondence along with e-mail ID : ……………………………………… and mobile number ………………………………………. ……………………………………….. ……………………………………….. ……………………………………….
3. Sex (Male/Female) : ……………………….
4. Date of Birth (DD/MM/YYYY) : ………………………
5. Age as on 31st March………… : ……………………..
6. Academic Qualification :

| Examinations | Name of the Board/University | Year of Passing | % of Marks obtained | Division/ Class/Grade | Subject/s |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

7. Job Profile (Furnish information in the following table, if applicable)

| Present Status | Designation/Cadre | Name of Employer | Cadre wise Experience in Year | Experience in years related to University Examination work |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

8. Institutional Accreditations (NAAC/NBA):

| **Name of the Institution** | **Year Accreditation** | **Subject/Institution** | **Period of validity of Accreditation** |
|---|---|---|---|
| | | | |

9. Research Degree :

| Name of degree | Name of University | Date of Award/ Notification |
|---|---|---|
| | | |

10. Research Guidance: Total Number of Research Students

| Degree | Number Enrolled | Thesis Submitted | Degree Awards | API Score |
|---|---|---|---|---|
| M.Phil. | | | | |
| Ph.D. | | | | |

11. Research Publications:

| S.N. | Title with Page Nos. | Name of Journal | National/International/ State /Local | Whether Peer revived | Whether you are the main author | API Score |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

12. Books Published:

| S N | Title of Book, Publisher, Year, Page Nos. and Author: | Local / National / International Publisher | ISBN No. | API Score |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| **Chapters Published in Books:** | | | | |
| S. N | Title of article, Editor, Publisher, Year, and Page Nos. | Level | ISBN Number | API Score |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

13. Research Project:

| S N | Title | Agency | Period | Grant (Rs. In Lakhs) | API Score |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

14. Invited Talk/Paper delivered in conferences/Seminars:

| S N | Name of Paper | Title of Conference | Level | Organized by | API Score |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

15. Total API Score: [ ]

16. Additional Information:

Details of other credential, significant contributions:

| Sr. No | Significant Contributions |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

**DECLARATION**

I, ................................................................. hereby declare that the information furnished above is true to the best of my knowledge and belief.

Place:

Date:

Signature

Name

τ

**Weightage Points for Academic Performance Indicators (API)**

| Activity | Faculty of Sciences / Engineering / Agriculture / Medical / Veterinary Sciences | Faculties of Languages / Humanities / Arts / Social Sciences/ Library / Physical education/ Management | Maximum score for University / College teacher |
|---|---|---|---|
| Research Papers published in: | Refereed Journals as notified by the UGC# | Refereed Journals as notified by the UGC | 25 per Publication |
| | Other Reputed Journals as notified by the UGC# | Other Reputed Journals as notified by the UGC | 10 per Publication |
| Publications other than journal articles (books, chapters in books) | Text/Reference, Books published by International Publishers, with ISBN/ ISSN number as approved by the University and posted on its website. The List will be intimated to UGC. | Text/Reference Books, published by International Publishers, with ISBN/ISSN number as approved by the University and posted on Its website. The List will be intimated to UGC. | 30 per Book for Single Author |
| | Subject Books, published by National level publishers, with ISBN/ ISSN number or State / Central Govt. Publications as approved by the University and posted on its website. The List will be intimated to UGC. | Subject Books, published by National level publishers, with ISBN/ISSN number or State / Central Govt. Publications as approved by the University and posted on its website. The List will be intimated to UGC. | 20 per Book for Single Author |
| | Subject Books, published by Other local publishers, with ISBN/ISSN number as approved by the University and posted on its website. The List will be intimated to UGC. | Subject Books, published by Other local publishers, with ISBN/ISSN number as approved by the University and posted on its website. The List will be intimated to UGC. | 15 per Book for Single Author |
| | Chapters in Books, published by National and International level publishers, with ISBN/ ISSN number as approved by the University and posted on its website. The List will be intimated to UGC. | Chapters in Books, published by National and International level publishers, with ISBN/ISSN number as approved by the University and posted on its website. The List will be intimated to UGC. | International –10 per Chapter<br>National – 5 per Chapter |
| Sponsored Projects | (a) Major Projects with grants above Rs. 30 lakhs | Major Projects with grants above Rs. 5 lakhs | 20 per Project |
| | (b) Major Projects with grants above Rs. 5 lakhs up to Rs. 30 lakhs | Major Projects with grants above Rs. 3 lakhs up to Rs. 5lakhs | 15 per Project |
| | (c) Minor Projects with grants above Rs. 1 lakh up to Rs. 5 lakhs | Minor Projects with grants above Rs. 1 lakh up to Rs. 3 lakhs | 10 per Project |
| Projects Outcome / Outputs | Patent awarded / Technology transfer / Product / Process | Major Policy document prepared for international bodies like WHO/UNO/UNESCO/UNICEF etc. Central / State Govt./Local Bodies | 30 for each International / 20 for each national level output or patent.<br>Major policy document of International bodies - 30<br>Central Government – 20,<br>State Govt.-10<br>Local bodies – 5 |

| Activity | Faculty of Sciences / Engineering / Agriculture / Medical / Veterinary Sciences | Faculties of Languages / Humanities / Arts / Social Sciences / Library / Physical education/ Management | Maximum score for University / College teacher |
|---|---|---|---|
| M.Phil. | Degree awarded | Degree awarded | 5 per candidate |
| Ph.D. | Degree awarded / Thesis submitted | Degree awarded / Thesis submitted | 15/10 per candidate |
| Invited lectures / papers | International | International | 7 per lecture / 5 per paper presented |
| | National level | National level | 5 per lecture / 3 per paper presented |
| | State/University level | State/University level | 3 per lecture / 2 per paper presented |

## Undertaking

I hereby undertake that the information furnished above is based on facts. In case it is found that the information is false or incorrect, I shall be liable for disciplinary action.

Signature of Applicant

## Verification

Verified at --------------------------- on ------------------ day of 20 ______ that the information furnished above is correct to the best of my knowledge and nothing has been concealed.

Principal

(परिशिष्ट- क)

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## आवेदकाचे स्वयं मुल्यमापन

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ/ संलग्नित महाविद्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्या गौरव पुरस्कारासाठी खालील माहिती आवेदकाने स्वतः भरुन नियंत्रण अधिकारी/प्राचार्य/संचालकांकडे सादर करावी.

अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नांव : ----------------------------------------------------------------

विद्यापीठ/महाविद्यालयाचे नाव : ----------------------------------------------------------------

पदनाम : ____________________ विभाग ________________ प्रथम नियुक्ती दिनांक ______________

| | | |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक पात्रता | |
| २ | सलग ५ वर्ष सेवा झालेली आहे काय? | |
| ३ | कार्यालयातील उपस्थितीचे प्रमाण | |
| ४ | कार्यालयीन कामकाजातील वक्तशिरपणा. | |
| ५ | वर्षभरातील घेतलेल्या सुटीचे प्रमाण | |
| ६ | कार्यालयीन कामकाजात आणलेली नाविन्यता | |
| ७ | कार्यालयीन कामकाजात सुलभता आणण्यासाठी केलेले प्रयत्न | |
| ८ | गोपनीय दर्जाचे काम/कागदपत्रे सांभाळण्याची जबाबदारी. | |
| ९ | कार्यालयीन कामकाजाचा स्तर उंचावण्याकरिता केलेले उल्लेखनीय प्रयत्न व योगदान | |
| १० | वरिष्ठांशी,सहकाऱ्यांशी व जनतेशी संबंध | |
| ११ | कार्यालयीन कामाबाबत कर्मचाऱ्यांमध्ये बांधीलकीची जाणीव निर्माण करण्यासाठी केलेले प्रयत्न | |
| १२ | विश्वसनीयता | |
| १३ | कार्यालयीन कामात सहकाऱ्यांना केलेल्या मदतीचे स्वरुप. | |
| १४ | कार्यालयीन काम करण्याची रुची व तसे योगदान | |
| १५ | प्रशासकिय कार्यात घेतलेले निर्णय (लागू असल्यास) | |
| १६ | कार्यालयीन कामातील दूरदर्शीता (Vision) व त्याच्या अंमलबजावणीकरीता केलेला प्रयत्न | |
| १७ | अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून काम करवून घेण्याची पद्धती | |
| १८ | विद्यापीठ/महाविद्यालयात नॅकचे मानांकन प्रक्रियेत असलेले योगदान | |
| १९ | कार्यालयीन कामकाजाचे प्रशिक्षण घेतले काय? | |
| २० | कार्यपुर्तीसाठी कार्याचे विभाजन व नियोजन केले काय? त्याचा तपशिल | |
| २१ | इतर | |

स्थळ -

दिनांक -

स्वाक्षरी

*टिप : आवश्यक तेथे पुरावे सादर करावे. आवश्यकता भासल्यास पुरवणी कागद वापरता येईल.*

## प्राचार्य /संचालक/ नियंत्रण अधिकाऱ्याचे अभिप्राय

(टिप : विद्यापीठ/महाविद्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे संदर्भात संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे सलग ५ वर्षाचे सेवेबाबतचा अभिप्राय. महाविद्यालयासंदर्भात प्राचार्यांनी/संचालकांनी संबंधिताच्या मागील सलग ५ वर्षाच्या गोपनिय अहवालाचे अंश नमूद करुन त्यासंबंधी अहवालाच्या प्रमाणित प्रती सोबत जोडण्या याव्यात.)

स्थळ :
दिनांक :

प्राचार्य/ संचालक/ नियंत्रण अधिकाऱ्याची
स्वाक्षरी व शिक्का

## कार्यालयीन उपयोगाकरिता
### अहवालातील निरिक्षण

कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.